# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## कर आकारणी विभाग

दर पत्रक नोटीस क्र. १ / २०२३

## निविदे कामी दर पत्रक मागविणे बाबत.

| | |
|---|---|
| कामाचे नांव : | नाशिक महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता करांकरीता मिळकतींचा इंडेक्स निहाय संपुर्ण पत्ता, मिळकतींचे अक्षांश/ रेखांश, मिळकतीतील नळजोडणीचा क्रमांक, विद्युत देयकावरील ग्राहक क्रमांक, मिळकतीचे छायाचित्र, मिळकतधारकांचे व्हॉटस्ॲपचा क्रमांक व ई-मेल इ. अनुषंगीक इ. माहिती प्राप्त करुन, मनपाने दिलेल्या कार्यप्रणाली अथवा Excel sheet मध्ये Data Entry करणे. |
| स्पष्टीकरण | नाशिक महानगरपालिकेच्या कर आकारणी विभागाचे वरिल प्रमाणे कामकाज करणेसाठी निविदा मागविण्याचे आहे. त्याकामी दर उपलब्ध नसल्याने बाजारभाव उपलब्ध करणेकामी खालील प्रमाणे कामाचे स्वरुप व व्याप्ती विचारात घेऊन विहीत मुदतीत कर पत्रके मागविण्यात येत आहेत. |
| कामाची मुदत : | ५ वर्ष |
| कामाचे स्वरुप व व्याप्ती | **अ) मालमत्तेची अनुषंगीक माहिती संकलित करणे :** नाशिक महानगरपालिका हद्दीतील संबंधीत विभागीय कार्यालयांच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकारच्या मिळतींची खालील प्रमाणे माहिती संकलित करुन मनपाने विकसीत केलेल्या संगणक कार्यप्रणालीवर तपशिलवार अपलोड करणे.<br>१.मिळकतधारक/ भोगवटादाराचे संपुर्ण नांव.<br>२. मिळकतधारक/भोगवटादार यांचा संपुर्ण पत्ता.<br>३.मिळकतीचे नांव, घर क्रमांक, गल्लीचे नांव, मुख्य रसत्याचे नांव, शिवार, सर्व्हे नंबर, प्लॉट नंबर, सि.टी.सं. नंबर, पिनकोड नंबर इ.<br>४. मिळकतधारक / भोगवटादार यांचे नावात दुरुस्ती असल्यास, सुचि-२, महसुल अभिलेख, ७/१२ उतारा, आधार कार्ड व पॅनकार्ड इ. कागदपत्र प्राप्त करुन, त्या त्या मिळकतीच्या इंडेक्स क्रमांकानुसार अपलोकड करणे.<br>५. मालमत्ता कर लागु असल्यास इंडेक्स क्रमांक, पाणीपट्टीचा इंडेक्स क्रमांक (एका पेक्षा जास्त नळकनेक्शन असल्यास सर्व इंडेक्स क्रमांक प्राप्त करणे), विद्युत पुरवठा ग्राहक क्रमांक (एका पेक्षा जास्त विद्युतपुरवठा कनेक्शन असल्यास ते सर्व ग्राहक क्रमांक प्राप्त करणे).<br>६. मिळकतधारकाचा मोबाईल क्रमांक, व्हॉटस्ॲपचा क्रमांक, ई-मेल आयडी.<br>७. मिळकतींचे छायाचित्र (छायाचित्र १८ मेघापिक्सल पेक्षा कमी नसावी)<br>८. मिळकतींचे अक्षांश/रेखांश<br>९. मनपा नाशिक महानगरपालिका हद्दीतील मिळकतींचे भौगोलिक परिस्थितीनुसार व कामकाजाचे सोईनुसार ब्लॉक तयार केलेले आहेत. त्या त्या ब्लॉक निहाय, ब्लॉक मधील मिळकतींची क्रमवारी लावणे व त्या क्रमवारीनुसार देयके व नोटीसा वितरीत/बजावणी करणे.<br>१०. मिळकतधारक संबंधीत मिळकती शिवाय मनपा हद्दीतील इतरत्र ठिकाणी वास्तव्य करीत असल्यास, त्याचा देयक बजावणीकामी पत्रव्यवहाराचा पत्ता.<br>११. मनपाने तयार केलेल्या ॲपमध्ये समक्ष जागेवर **जाऊन** सर्व माहिती संकलित करुन मिळकतींचे दोन बाजुची छायाचित्रे ॲपवर अवलोड करणे बंधनकारक आहे. मात्र काही अपरिहार्य करणास्तव समक्ष जागेवर जाऊन सर्व माहिती ससंकलित करुन ॲपवर अवलोड करणे शक्य न झाल्यास अशा प्रसंगी उपरोक्त माहिती हस्तलीखीत फॉर्मवर संकलित करुन ती माहिती व मिळकतींचे दोन बाजुची छायाचित्रे मनपाचे ॲपवर अपलोड करणे. |

| | |
|---|---|
| | १२. संबंधीत विभागीय कार्यालयांच्या कार्यकक्षेतील मिळकतींचे मालमत्ता कराची देयके व नोटीसा बजावणी करतांना नव्याने निर्माण झालेल्या मिळकतीचे तसेच यापुर्वी मालमत्ता कर लागु न केलेल्या मिळकतींची उक्त् माहिती वेळोळी ब्लॉक निहाय संकलित करणे.<br>१३. संबंधीत विभागीय कार्यालयांच्या कार्यकक्षेतील मिळकतींची महानगरपालिकेने वेळोवेळी सुचित केलेली अतिरिक्त माहिती संकलित करणे. |
| अंदाजे विभाग निहाय मिळकत संख्या - ४८३९४१<br>(प्रथम वर्षात - ४८३९४१ मिळकत संख्या त्यामध्ये पुढील ४ वर्षाकरीता १० टक्के वाढ विचारात घेऊन एकुण मिळकत संख्या व नोटीस संख्या ) | |
| मिळकत संख्या निहाय दर र.रु (अंकी व अक्षरी) | |

वरिल प्रमाणे कामकाजाचे वाजवी दरपत्रके उप आयुक्त (कर), कर आकारणी विभाग, तळ मजला राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक यांचे कार्यालयात दि. १४ / १२ / २०२३ रोजी सायंकाळी ५.०० पावेतो सादर करावी.

Sd/xxx
उप आयुक्त (कर)
नाशिक महानगरपालिका, नाशिक